
Special Issue 7th
January, 2018

ISSN-2250-0383
UGC Approved (SL NO. 2630)
Journal No. 48999.
IMPACT FACTOR - 0.421

# SHODHANKAN

## STRATEGY OF WAR AND PSYCHOLOGY



- EDITORS -
Dr. Abhimanyu Dhormare
Dr. Ashok Kanade

Scanned by CamScanner

ऱ. 44-51

Dr.Prashant S.Deshmukh
Research Guide, Dept.of History
A.R.B.Garud College Shendurni,
Tq. Jamner, Dist. Jalgaon-424204

Special Issue 7th
January, 2018

ISSN – 2250-0383
UGC Approved SL No. 2630
Journal No. 48999
Impact Factor 0.481

International Multi-Disciplinary Research Journal

**SHODHANKAN**

**UGC - Western Regional Office, Pune Sponsored**
**National Seminar – 12th & 13th January, 2018**

# STRATEGY OF WAR AND PSYCHOLOGY

**Organised By**
Parth Vidya Prasarak Mandal's
**BABUJI AVHAD MAHAVIDYALAYA, PATHARDI, DIST - AHMEDNAGAR**
(Department of Psychology & Department of History)

**Editors**
**Dr. Abhimanyu R. Dhormare**
(Head, Department of Psychology)

**Dr. Ashok K. Kanade**
(Head, Department of History)

**Prof. Arjun S. Kerkal**
(Department of History)

**Guest Published By**
**Dr. G. P. Dhakane**
Principal,
Babuji Avhad Mahavidyalaya, Pathardi, Dist- Ahmednagar (Maharashtra)

Scanned by CamScanner

ISSN NO. 2250-0383

# दुसरे जागतिक महायुध्द व हैद्रबाद संस्थान

14

**प्रा.डॉ. प्रशांत देशमुख**
इतिहासप्रमुख व मार्गदर्शक
अप्पासाहेब र.गा. गरुड महाविदयालय
शेंदुर्णी, जि. जळगांव.

इस 1939 ला दुसरे जागतिक महायुध्द सुरु झाले. सम्राज्यवादी विरुध्द हुकुमशाह यांच्यातील हा संघर्ष 1945 पर्यंत चालला. भारतात ब्रिटिशांचे सम्राज्य असल्याने जागतिक महायुध्दात ब्रिटिश भारत आणि संस्थाने ब्रिटिशांच्या बाजूने युध्दात सहभागी होती. हैद्राबात संस्थान दि. 12 ऑक्टोंबर 1800 ला ईस्ट इंडिया कंपनीच्या तहाने ब्रिटिशांच्या अधिन झाले. इ.स. 1800 पासून ब्रिटिशांचे हैद्राबाद संस्थानावर वर्चस्व होते.

द्वितीय जागतिक महायुध्द काळात ब्रिटिश शासनाने सात वटहुकुम जारी केल्याने वर्तमानपत्रांची कठोर कुस्कटदाबी करण्यात आली. 900 वर्तमानपत्रांना द्वितीय जागतिक महायुध्द काळात झळ पोहचली. मुंबई इलाख्यातील 100 वर्तमानपत्रांचा समावेश या 900 वर्तमानपत्रांत होतात्र याबाबत महात्मा गांधींनी यंग इंडियातून पत्रकारांने आणि वुत्तपत्र प्रकाशकांनो तुमच्यावर लादलेला दंड भरु नका, तुमचा छापखान जप्त होईल पण तुमची लेखणी शासन जप्त करु शकणार नाही.[1] असे लिहिले. हैद्रबाद संस्थानात मराठी वर्तमानपत्रांवर बंदी होती. मराठवाडा व केसरी याचे उत्तम उदाहरण होते. निजाम जप्त करु शकला नाही. केसरी, ज्ञानप्रकाश, ज्ञानोदय(मराठी), नवाकाळ, नवशक्ती, लोकशक्ती, लोकमान्य, तरुण भारत (बेळगांव व नागपुर), पुढारी जागृती, मातृभूमि, महाराष्ट्र, मराठवाडा, निजाम विजय, इत्यादी मराठी वर्तमानपत्रांनी हैद्राबादच्या प्रश्नसंबंधी लिखाण केले.

जागतिक महायुध्दाच्या काळात लिखाण व बातम्यावर मर्यादा राहिल्या. मराठी वर्तमानपत्रांनी स्वातंत्र्य आंदोलन संस्थानातील राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळी संबंधी लिखाण केले. संपादकीय लिखाण या सर्व लिखाणात महत्वपूर्ण होते.[2] जागतिक महायुध्दाच्या घडामोडी आणि बातम्यामुळे वर्तमानपत्रातील संपादकीय आणि बातम्यांना जागतिक घडामोडींच्या बातम्यांच्या तुलनेत कमी जागा मिळाल्या.[3] जागतिक महायुध्द आणि त्यापूर्वीच्या बातम्यात व्यक्तिगत मतांपेक्षा पक्ष, संस्था व संघटनेच्या मताला महत्व अधिक होते. हैद्राबाद संस्थानातील 1938, 1940, 1942 च्या संघर्षात वर्तमानपत्रात आलेल्यसा बातम्या प्रांरभीला पत्रव्यवहारातून आलेल्या मजकुरावर आधारित होत्या. मात्र जागतिक घडामोडींचा वेग लक्षात घेता या बातम्यांत तार हा महत्वाचा आधार घटक होतात्र वर्तमानपत्रांत तीन घटकांना प्राधान्यता होती ते घटक म्हणजे लेखणी – जिभ आणि कृती.[4] हैद्रबाद संस्थानातील चळवळीचा विचार करता स्वातंत्र्या, जबाबदार शासन पध्दती, चलेजाव, भारत छोडो, इन्कलाब जिंदाबाद, वंदेमातरम् इत्यादी घोषणा संस्थानात प्रजा धाडसाने करु लागली होती. याचे श्रेयत वर्तमानपत्रांनाच आहे. देशातील संस्थानातील चळवळी प्रकट करण्याचे सामर्थ्य व धैर्य वतमानपत्रांनी दाखविले नसते तर प्रत्यक्ष चळवळ करणाऱ्यांना स्फुरणं चढले नसते. केसरीतील बातम्यांचा दर्जा व स्पष्टोक्ती वाखाणण्याजोगी होती. राष्ट्रीय विचाराने केसरीने आंदोलन चालविले व ते सफल करेपर्यंत त्या आंदोलनाचा पाठपुराव केसरीने कधीही सोडला नाही. हैद्रबाद संस्थानचा प्रश्न अशाच आंदोलनापैकी एक होय.[5] स्थानिक आणि प्रांतीय वृत्त मराठी वर्तमानपत्रे मोठ्या प्रमाणात देत. संस्थानातील वर्तमान स्थिती, संस्था, कार्यक्रम, सण, उत्सव, व समारंभ यांना मराठी वर्तमानपत्रांनी महत्व दिले.

जागतिक महायुध्दाच्या काळात बातम्यांचा ओघ पाहता संपादकीय लिखाणापेक्षा उपसंपादकाचे लिखाण सजावटपूर्ण देण्यावर, वार्ताहरांनी सविस्तर वृत्तांत देण्यापेक्षा संक्षिप्त वृत्तांत देण्यावर व सारग्राह्या पध्दतीने छापण्यावर जागतिक महायुध्दाच्या काळात मराठी वर्तमानपत्रांनी भर दिला. मराठी वृत्तपत्रांचे चित्र मुवलक पृष्ठ संख्सा आणि मजकरांची कमतरता जागतिक

Scanned by CamScanner

महायुध्दाच्या प्रारंभी असे चितत्र होते. अशावेळी जाहिराती चित्रमय झाल्या, बातम्या चित्रमय पध्दतीने देण्यात येवू लागल्या. सत्याग्रही, आंदोनकर्ते यांची छायाचित्रे देण्यात येवू लागली. काव्यमय लिखाणापेक्षा गद्यमय लिखाण अधिक महत्वपूर्ण असले तरी स्वातंत्र्या संबंधी शायरी – काव्यवजा लिखाण केसरी सारख्या वर्तमानपत्रांनी केले. इ.स. 1938–40–42 च्या काळात केसरीतून हैद्राबाद संस्थानातील चळवळीवर पोवाडे, शायरी, काव्ही प्रसिध्द करण्यात आले. मराठी वर्तमानपत्रांत अर्ध साप्तहिक, साप्तहिक यांचे लिखाण चिंतणात्मक आणि कठोर स्परुपाचे हेते. दैनिकांत येणार मजकुर 'ताजा शिधा व ताजा स्वयंपाक' या तत्वावर आधारित होता.[6] याबाबत न.चिं.केळकरांनी अन्नातील शुध्दता व स्वाधीनता बाहेरील आणलेल्या अन्नास राहत नाही त्याप्रमाणे आज दैनिकांतील विचारांची स्थिती आहे. व्यक्तिगत निंदा अथवा आरोप – प्रत्यारोप सतत एक वृत्तपत्रांवर करताना आढळणे पण केसरीने कोणत्याही आंदोलनात, घटनेत अथवा चळवळीत व्यक्तिगत निंदा करणे कटाक्षाने टाळल्याने दिसते असे म्हटले.[7]

मराठी वर्तमानपत्रांची स्वातंत्र्याच्या काळात याच विचाराने पत्रकारिता केली. न.चि. केळकरांच्या शब्दात– "The man who takes to ink, others take to dirnk is a journalist" ज्याच्या अंगता रक्ताबरोबर शाई ही भिनली आहे तो खरा पत्रकार. [8] याची प्रचिती ल.ब.फाटक, ल.बं.भोपटकर, ग.त्र्यं. माडखोलकर, आ.कृ. वाघमारे, दिगंबरराव बिंदू, न.चि.केळकर, दा.वि. गोखले, आचार्य जावडेकर, शंकर देव, ज.स.करंदीकर, निळकंठ खाडीलकर, श्री.रं.कुलकर्णी इ.नी. हैद्रबात संस्थान प्रश्नासंबंधी चालवलेल्या चहळवळीतून व पत्रकारितेतून दिसून येते.

वृत्तपत्रांचे नियंत्रण करणारा व इ.स. 1931 ला लागू करण्यात आलेला Emergency Powers Act – 1931 नुसार वृत्पत्रांच्या मुद्रांकावर विशेष प्रकारची जबाबदारी या कायद्यांन्वये टाकली होती. या कायद्यातील 18(1) कलमानुसार अनधिकृत वृत्तपत्र तयार करणाऱ्याला शिक्षेची तरतूद असणारा कायदा जागतिक महायुध्दाच्या काळात लागू करण्यात आला.[9] हैद्रबात संस्थानात गुप्तपध्दतीने येणारे व बंदी असलेल्या मराठी वृत्तपत्रांचे पूनर्रमुद्रण (सायक्लोस्टाईल्स) होणे बंद झाले. सकाळ वृत्तपत्रांनी जागतिक महायुध्दात काळातील स्थानिक प्रश्न विशेषतः मराठी भाषेच्या कुचंबणेचा हैद्राबाद संस्थानातील प्रश्न सोडविण्यासाठी 'मराठीच्या अभिमान्यांना जिव्हाळ्याचा इशारा'[10] हा अग्रलेख छापला. या अग्रलेखातून[11] युध्दकालीन स्थानिक प्रश्नांची उकल करण्यासाठी अखिल भारतीय स्तरावरिल परिशदां उपयुक्त होणार नाहीत. महाराष्ट्र साहित्स संम्मेलनाप्रमाणे हैद्रबाद संस्थानात निजाम प्रांतीय मराठी संम्मेलनाचेही अधिवेशने घेण्यात येत असत. सप्टेंबर 1743 ला निजामप्रांतीय मराठी साहित्य संम्मेलनाचे दुसरे अधिवेशन नांदेड येथे दत्तो वामन पोतदार यांच्या अध्यक्षते खाली झाले. या प्रांतीय अधिवेशनात रियासतकार गो.स.सरदेसाठी यांनी 'अशी प्रांतीय संम्मेलने फुटीर व्रवृतीची निर्देशक असतात'[12] असे मत मांडले.

इ.स. 1942–43 ला युध्दकालीन परिस्थिती, जागतिक अन्नधान्याचा तुटवडा, महागाई, इ. परिस्थितीत देशात वर्तमानपत्रांवर व बातम्यावर निर्बंध प्रस्थापित झाले. या परिस्थितीत वृत्तपत्राचे ध्येय काय? याबाबत न.चि.केळकरांनी कुंबई मराठी पत्रकार परिषदेत उत्तर दिले की, 'परतंत्र राष्ट्रातील पत्रकारांचे ध्येय स्वदेशाची स्वातंत्र्याप्राप्ती हे एकच असणार व स्वातंत्र्य कसे संपादन करावे हा एकच ध्यास राहिला पाहिजे आणि सगळया राष्ट्राने ज्याचा ध्यास घेतला तेंच त्या देशातील वृत्तपत्रांचे ध्येय असते'. यातून मराठी वर्तमानपत्रांचा बाण स्पष्ट होतो.

युध्दकालीन वर्तमानपत्रांवरिल निर्बंधामुळे वर्तमानपत्रांची पृष्ठसंख्या आणि आकार कमी झाला. वर्तमान पत्राच्या कागदाचा तुटवडा वाढला. त्यामुळे युध्दाच्या बातम्या जास्त असल्या तरी बातम्या सेन्सार कडून छाटणी होवून येत असल्यायने मर्यादित प्रमाणात येत. शासनाने वर्तमानपत्रांचा कागद आणि किंमत यांचा मेळ घालणारी योजना [13] घोषीत केली. वर्तमानपत्रांच्या पृष्ठ आणि आकारावर मर्यादा प्रस्थापित करण्यात आल्या,[14] त्यामुळे वर्तमानपत्रांत हैद्रबात संस्थानच्या बातम्या कमी प्रमाणात दण्यात येवू लागल्या. केसरीत 'निजाम संस्थान वृत्त' आणि 'प्रासंगिक बोल' हे सदर पृष्ठ 10 वर असे. 1942–43 ला केसरीचा आकार व पृष्ठसंख्या 16 ऐवजी 6 पर्यंत कमी झाली. मासिक – त्रैमासिक वर्गणीदार बंद झाले. जाहिराती कमी झाल्या. जागतिक यध्दाच्या बातम्यासाठी जागा ठेवावी लागली त्यामुळे वर्गणीदारविाय वर्तमान पत्रांची विकी बंद झाली वृत्तापत्रांच्या दृष्टीने



Scanned by CamScanner

ISSN NO. 2250-0383

1943 हे वर्ष संघर्षशील होते. वृत्तपत्रीत आचारसंहीतामुळे अनेक वर्तमानपत्रांनी आपले प्रकाशन थांबविले. जे वर्तमानप. सावधगिरीने पत्रकारिता सांभाळत होती. त्यांना कागद पुरवठा तोटका (मोजका) होत असल्याने वर्तमानपत्र आपले ध्येय बाळगून पत्रकारिता सांभाळता होती. भाषा, मजकुर, घटना, संदर्भ, अवहेलना, नाराजी, पाठिंबा इ. कारणास्तव वर्तमानपत्रांवर शासनाचा रोष केंव्हा उद्‌भवेल हे सांगता येत नव्हते. वर्तमानपत्रांना कागद वाटप पध्दतीने [15] दिला जात असल्याने वर्तमानपत्रे जाहिरात विरहीत झाली, पृष्ठे कमी झाली व शासन आणि वर्तमानपत्रे यांच्यातील तेढ युध्दकाळात वाढली.

हैद्रबाद संबंधी युध्दकाळात मराठी वर्तमानपत्रांतील बातम्या 'ब्रिटश शासनाला हैद्राबादची मदत, पाठिंबा, सहकार्य' या आशयाच्या आहेत. प्रांतीय परिषदांच्या माध्यामातून हैद्राबाद संस्थानात चळवळ युध्दकाळात वाढली. प्रांतीय परिषदांबद्दलचे वृत्तांत त्रोटकपणे मराठी वर्तमानपत्रांतून देण्यात आले.[16] उदाहरणार्थ उमरी येथे 22–23 फेब्रुवारी 1940 ला महाराष्ट्र परिषदेचे झालेले अधिवेशन इत्यादी.

हैद्रबाद संस्थान युध्दाकाळात ब्रिटिशांना साहया करणाऱ्या प्रमुख संस्थानापैकी एकहोते. जागतिक महायुध्दाची व्याप्ती आणि युध्दाचा होणारा प्रतिदिन 20 कोटी रुपये खर्च असला तरी हैद्रबाद संस्थानचे क्षेत्रफळ, आर्थिक संपन्नता याचा विचार करता निजामाला ब्रिटिश हे हैद्रबाद संस्थान व संपत्ती ताब्यात घेतील अशी मनोमन भिती वाटत होती.[17] असे हैद्रबाद संस्थानचे पंतप्रधान नवाब छतारींनी आपल्या आत्मचारित्रात 'यादेअयाम' मध्ये 11 फेब्रुवारी 1942 च्या नोंदीत नमूद केले आहे. निजामाला हैद्राबाद संस्थानाच्या ब्रिटिशांना युध्दकाळात करीत असलेलया साह्यतेच्या बदलयात कांही घटकांची मान्यता हवी होती.[18] मराठी वर्तमानपत्रांनी या घटनां नमूद केल्या आहेत. ब्रिटिशांकडून निजामाला अपेक्षीत मागण्या[19] पाहता निजाम शासनाने ब्रिटिशांना देवू केलेंली साह्याता, दर्जा यावरुन हैद्राबादची स्थिती लक्षात येते. युध्दकाळात शांतता आणि स्थैर्य रहावे म्हणून निजाम शासनाने ब्रिटिशांना उपयोगी पडतील अशा आर्थिक धोरणांची अंमलबजावी केली. मराठवाड्यात 1939–40 हे वर्ष अवर्षणप्रवण वर्ष हेते जागतिक महायुध्द काळात अन्नधान्याची टंचाई जाणवत होती. यावेळी संस्थनात मराठवाड्यात दुष्काळ असल्याने, पीके न पिकल्याने 50 लक्ष रुपयाची सारा सूट निजामाने घोषित केली. निजामशासनाच्या या घोषणेचे स्वागत व अभिनंदन मराठी वर्तमानपत्रांनी केले. [20] निजाम शासनाने युध्दकाळात संस्थनातील शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याच्या दृष्टिकोनातून 9 बोर्ड नियुक्त केले व ऋण असणाऱ्यांची प्रकरणे निकालात काढली. कर्जदार शेतकऱ्यांना कर्जमुक्ततेची प्रमाणपत्रेही प्रदान केली. एकुन 26 कर्ज मुक्त करणारी मंडळे स्थापन केली. युध्दकाळात कर्ज वाढण्याचील शक्ता असतांना निजाम शासनाने शेतकऱ्यांना सारा माफी, कर्ज मुक्ततेची प्रमाणे याबाबत पुरोगाम कोल्हापुर संस्थानातील वर्तमानपत्र दै. पूढारीने 'निजाम राज्यांतील कर्ज तडजोड' हा अग्रलेख छापून कर्ज तडजोड कार्याचा हा निजाम राज्यातील अहवाल इतरांनाही बोधप्रद व मार्गदर्शक होईल यात शंका नाही.[21] असे नमूद केले. लोकोपयोगी निर्णयाद्वारे शांतता व स्थैर्यता स्थापन करुन ब्रिटिशांकडुन आपल्या मान्य करुन घेण्याची निजामाची ही निती सर्व प्रसिध्द होती. याच वेळी माफ केलेला शेतसारा रक्कम धान्य घटकांडून उभा करण्यासाठी निजामाने वरार फंड (War Fund) काढले व वारफंड गोळा करण्यासाठी संस्थानातील अधिकाऱ्यांनी व्यापारी व भांडवलदारांना छळले. याचे उदाहरण केसरीने हैद्रावाद संस्थानातील जुलुम[22] या बातमीत [23]

युध्दकाळात निजामाने हैद्रावादेत युध्दोपयोगी साहित्य निर्माण करण्यासाठी कारखाने सुरु करण्यावावत योजना तयार केल्या व दळणवळण वाढावे म्हणून रेल्वेच्या जनरल मॅनेजरांना समितीत सल्लागार म्हणून नेमले. 1938 च्या वेळी मागास असणारे हैद्रावाद 1940 – 41 ला प्रबळ व समृध्द हैद्रावाद संस्थान वनले. [24] ही प्रगती केंसरी, ज्ञानप्रकाशच्या डोळयाआड राहू शकली नाही. युध्दकाळात 35 जणांची संरक्षण समिती निजामम शासनाने नियुक्त केली. याचा ही उल्लेख 'डिफेन्स कॉन्सिल' असा केसरीने केला.[25]

इ. स. 1940 – 41 चे वार्षिक अंदाजपत्रक निजाम शासनाने जाहिर केलेत्र दैत्र पुढारीने 'हैद्राबादचे अंदाजपत्रक [26] या अग्रलेखात नमूद केली की, 'अंदाजपत्राक पाहता संस्थानाची आर्थिक स्थिती भररक्कम झाली असुन कोणताही डोईजवळ कर न बसविंता लोकोपयोगी बाबींवर उत्तरोत्तर



Scanned by CamScanner

वाढता खर्च करणे शक्य होत आहे. शिलकी[27] अंदाजपत्रक निजामाने युध्दकाळात घोषित करुन पुरोगामित्वाचे धारेण अवलंबविण्यासाठी रक्कम घोषीत [28] केली. युध्दाच्या व दुष्काळाच्या कामाचा बोझा असतांनाही संस्थनाने लोकोपयोगी कामाकडे दुर्लक्ष केले नाही. यावरुन संस्थानाची स्थिती चांगली आहे. [29] हे मराठी वर्तमानपत्रांची प्रसिध्द केले. संपत्तिक स्थिती भक्कम असताना युध्द व दुष्काळ काळात काटकसर करण्याचे निजाम शासनाने पत्रकात काढले शिवाय युद परिस्थितीत संस्थनात उद्योगधंदे वाढीला लागावेत म्हणून समिती नियुक्त करण्याच्या निजामाच्या योजना पारंपारिक राज्याला प्रगतीकडे पोहचविणाऱ्याच आहेत. [30] असे पुढरीने अग्रलेखात स्पष्ट केले.

'निजामाची युध्दकालीन योजना आपल्या मागण्या मान्यस व्हाव्यात यासाठी व युध्दकाळात ब्रिटिश शासनाला केलेल्या मदतीच्या मोबदल्यात व युध्द प्रारंभापासून ब्रिटिशांना पाण्यसारखा पैसा दिला या बदल्यात ब्रिटिश निजामाला आंध्रचा भाग देतील ही आशा आहे. तशी बातमी प्रासंगिक विचार सदरात 'मराठी ज्ञानोदयाने' 'आंध्रपांत निजामास देणार काय'? [31] या शिर्षकाखाली प्रसिध्द केली. याचा बातमीत 'निजामाला आंध्रचा भाग ब्रिटिशांकडून मिळेल असे वाटते' पण या भागातील लोकच 'आंध्र स्वतंत्र बनावा [32] या विचाराचे आहेत से लोकमताला प्राधान्या देणारे विचार ज्ञानोदयने मांडले. इ.स. 1939–44 या पाच वर्षात निजाम प्रदेशात (मराठवाडा) शेतसारा घेतला जाणार नाही असे निजाम शासनाने 1937 ला आपल्या राज्यरोहणाच्या रौप्य महोत्सवी (1922 –37) वर्षानिमित्त घोषित केले होते. 1939 सप्टेंबरला युध्द सुरु होताच अधिकाऱ्यांनी टंचाई लक्षात न घेता शेतसारा सक्तीने वसूल केला. केसरी म्हणतो की, घोषणाची शाई वळतो ना वाळते तोच शासनाने तगाई रक्कम वसूल केली. दरबाराचा हुकुम दरबारानेच मोडला तर दरबारावर कोणचाच विश्वास बसणार नाही हे लक्षात घ्यावे व वसूल केलेला तगाई (शेतसारा) वपरत करावा[33] अन्यथा चळवळ चालविल्याशिवाय पर्याय राहणार नाहीत्र असे सुचित करुनप संघटन करण्याची गरज अभिप्रेत मानलीत्र जागतिकब महायुध्दात जपानने आग्नेय आशियात साम्राज्यविस्तार केलात्र जपान फॅसिस्ट – हुकुमशहाच्या गटात असल्याने जपानच्या साम्राज्यवादा विरोधात हैद्राबाद संस्थानात हैद्राबाद, भोंगिर, खमनपेठ, इत्यादी ठिकाणी परशदा झाल्या. यास मराठी वर्तमानपत्रांनी विशेष करुन स्थान दिलेत्र

निजाम उद्योग, व्यापार आणि शस्त्रनिर्मितीत युध्दकाळात प्रगती करु इच्छित होता म्हणुनच दळवणवळा वाढण्यासाठी रेल्वे मॅनेजरानां सदस्य म्हणून उद्योग – व्यापार वाढीसाठी नियुक्त केलेल्या समितीत घेतले होतेत्र युध्दकाळात 1940 ला निजामाने ब्रिटिशाकडे रेल्वे सुरक्षेसाठी असणारे सैन्य ब्रिटिंशानी वापर घेण्याची विनंती केली व रेल्वचेवर असणारे बिटिंशाचे वर्चस्व दुर केल [34] उद्योग याच वेळी 'रेल्वे' (निजाम स्टेट रेल्वे) कर्मचाऱ्यांनी नोव्हेंबर 1942 ला संप केला. त्यामुळे दळणवळा आणि मालवाहतूक ठप्प झाली. यसुध्दकाळात झालेल्या संपामुळे वस्तुंच्या किंमती नियंत्रणात ठेवता आल्या नाहीत. बोधन (आंधप्रदेश) येथे असणाऱ्या साखर कारखान्यातुन साखरर तुटवडा लक्षात घेता संस्थानभर 28 वॅगन्स साखर वितरित करण्याल आली.[35] मराठी वर्तमानपत्रांनी इ. स. 1942 – 43 मधील अन्नधान्याच्या बाबतीत असणाऱ्या बातम्या प्रसिध्द केल्या. उदहरणार्थ हैद्राबात संस्थानात औरंगाबाद विभागाबत ज्वारीसाठी डोळयात अश्रु येत आहेत. सरकीचा भाव औरंगाबादेत प्रति क्विंटल 6 – 7 रुपये वरुन 13 – 14 रुपये झाला आहे. इ. भाव नियंत्रण धोरणामुळे सर्वत्र ही परिस्थिती होती पण संस्थानात दुष्काळ आणि शासनाच्या स्वार्थी धोरणामुळे परिस्थीती अधिकच बिकट होती. ज्ञानप्रकाशने याचे मतासलेवाईक[36] उदाहरण प्रसिध्द केले.

इ. स. 1942 च्या दु काळच्या काळात गुलबर्गा व मराठवडयातील कोरडया दुष्काळामुळे अन्नधान्याची टंचाई तीव्र बनली, महागाई वाढली. याबाबत महाराष्ट् परिषद आणि कर्नाटक परिषदेच्या सदस्यांनी अहवाल तयार करुन स्थलांतरित होणाऱ्यसां लोकांन सहयता दिल्याचे वर्तममानपत्रांनी प्रसिध्द केले. युध्दकाळात धातुची टंचाई जाणवू लागल्याने चलनात नाण्यांनी टंचाई निर्माण झाली. निजामाने यावर उपय म्हणून 1 रुपये किंमतीच्या नोटां प्रसिध्द वितळविण्यास+यास 5 वर्षे कैद शिक्षाची तरतूद केल्याचे सोलापूर समाचाराने प्रसिध्द केले.[37]

हैद्राबात संस्थानाचे युध्दकाळात चलनवाढीला आळा घालण्यासाठी प्रतिवर्ष नफा 24,000 असणाऱ्यांना दि. 1 एप्रिल 1941 पासून 40 टक्के कर घेण्याचे ठरवले. यापैकी 50 टक्के रक्कम निजाम शासन युध्द समाप्तीनंतर परत करणार व यातुन शासनाला प्रतिवर्ष 50 लाख रुपये प्राप्त



Scanned by CamScanner

होतील व हा पैसा युध्दकालीन योजनांवर खर्च करणार असल्याचे निजामाने जाहिर केले. याबाबत ज्ञानप्रकाशने 'हैद्राबात संस्थानाची जादा नफयावरील कराची योजना' हा अग्रलेख नोंदविल. यात स्पष्ट केले की, ' योजना योग्य आहे पण ज्यांनी पैसा खर्च करुन टाकलना त्यांनतर उभा करणे अवघड आहे. [38] युध्दकाळात आणि दुष्काळ निवारणासाठी निजामानले जादार करापोटी प्रतिवर्ष 50 लाख रुपयाची उभारणी करुन त्यापैकी 24 लाख रुपये निजाम राासनाने पिनक वाढीसाठी खर्च केले. बी .– बियाणे पाणी, सिंचन इत्यादी सवलीती प्रदा`ल्याा व पिक लागवडीचे [39]

प्रमाण इ. स. 1942 च्या तुलनेत इ. स. 1943 मध्ये वाढविण्याात आले. व्यापारी पिकांचे क्षेत्र कमी करुन खाद्यान्न पिकांचे क्षेत्र वाढविण्यात आले. दुष्काळ निवारणासाठी धान्य शासनाने धान्य संकलीत करण्यासाठी प्रति एकर 1 मण धान्य गोळा करुन ठेवण्याचे नमूद केले. या सर्व अन्न टंचाईच्या बातम्या, महागाई वस्तुंचा तुटवडा, जागतिक व राष्ट्रियस्तरावरच्या बातम्या मराठी वर्तमानपत्रांत देण्यात येत. या बातम्या बरोबर हैद्राबात संस्थानातील धान्यटंचाई योजना, स्थिती इ. च्या बातम्य हि प्रकाशित करण्यात आल्या इ. स. 1943 ला शासनाने धान्य नियत्रण धोरण जाहिर करताच महागाई वाढली व्यापा–यांनी धान्याचे साठे करुन ठेवले धान्यटंचाईने बाजारात मुल्य वाढले त्यामुळे महाराष्ट् परिषदेच्या कार्यकर्त्यांनी व्यापा–य्रांवर लक्ष ठेवले. [40] याबाबत प्रांताप्रांततील धान्याची टंचाई व उपयायोजना यांच्याबाबत मराठी वर्तमानत्रातुनन बाातम्या प्रकाशित झाल्या. धान्य टंचाई नियत्रणांत आणण्यासाठी निजाम शासनएने धान्यसाठा करण्यासाठी मराठवाडा व कर्नाटक भागातून प्रति एकर 1 मण तर तेलंगणातून अर्धामण धान्य गोळा करण्याचे ठरविले. अन्नधान्यांच्या प्रश्नाबाबत चर्चा करण्यासाठीच महाराष्ट् परिषद – कर्नाटक परिषद आणि आंध्र महासभांची एकत्रित परिषद दि. 18 – 19 जानेवारी 1944 ला हैद्राबात घेण्यात आली. अन्नधान्याच्या प्रश्नावर चर्चा करण्याचा उद्देश परिषदांच्या असल्याने परिषदेला शासनान मान्यता दिली. अन्नधान्य व युध्दकालीन प्रश्नाबरोबर राजकीय चर्चातून हैद्राबाद स्टेट कॉग्रेसची बंदी आणि लढयाची आवश्यकता विदित झाली. तिन्ही परिषदांची संयुक्त बैठक [41] या शिर्षकाने मराठी वर्तमानपत्रांत याबाबत बातम्या देण्यात आल्या.

अन्नटंचाई आणि सांस्कृतिक घटकांसंदर्भात शासनावर टिका वर्तमानपंत्रातुन प्रकाशित होवू लागल्या म्हणून इ. स. 1943 च्या प्रारंभी निजामाने अन्नटंचाई उस्मनिया विद्यापिठ इ. बाबत बातम्या, लेख व टीका प्रसिध्द करण्यास सस्थानातीहल सर्व भाषीक वर्तमानपत्रांना बंदी केली. [42] शासनाच्या यामगाचा उद्देश संस्थानात या प्रश्नाबाबत लोक जागृती होवू नये हा होता दै. पुढारीने हैद्राबात संस्थानात वृत्तपत्रांची मुस्कटदाबी! [43] अग्रलेख लिहिला व शासनाच्या कडाडुन टिका केल्या.

धान्य टंचाईच्या संदर्भात केसरीने इ. स. 1944 च्या अंकात सविस्तर अग्रलेख लिहिले. निजामशाहीत खालासाप्रमाणे अधिक धान्य पिकवा असा फतवा काढला. शासनास शेतक–यांनी कितवा हिस्सा धान्य विकावे याचा आदेशहि काढला. या फर्मानचा अर्थ न लागल्याने कायकते, लोकप्रतिनिधी व शेतक–यांनी एकत्र येवून 24 मे 1944 ला बीड येथे एक परिषद घेण्याचे ठरवताच लोकप्रतिनीधी अध्यक्ष, व चिटणीस यांना कैद करण्यात आले. शासनावर या परिषदांचा दबाव वाढला. शासनाने सर्वांची मुस्कटदाबी केली. याबाबत केसरीने हा वृत्तांत निजामी अधिक–यांची अरेरावी [44] असे लोकजागृती कार्य घडविण्याचे काम मराठी वर्तमानपत्रांनी केले.

शासन एकरी मण या प्रमाणे ज्वारी – बाजरी खरेदी करुन दुष्काळात अन्नधान्य पूरवता यावे म्हणून धान्यसाठा गोळा करीत असे. शासन खरेदी करीत असलेल्या धान्याला योग्य भाव मिळावा, वाहय भागातील भावा एवढा गोळा करीत असे. शासन खरेदी करीत करताना प्रत्येक मणमागे 2 शेर धान्य अगाउ (कडता) घे त्याप्रमाणे चांगल्या धान्यामागे अगाउ (कडता) घेतला जावू नये अशी वातमी केसरीने दिली.[46]

निजाम शासनाच्या शासकीय धान्य खरेदीच्या धोरणाबावत, हमीभावाबददल आणि आगाउ (कडता) धान्य घेंण्यावावत मराठी वर्तमानपत्रांनी संस्था, प्रांतीय परिषदां कार्यकर्ते व जनतेच्या मागणीस्तव धान्य खरीदीचे भाव वाहय भागातील भावा एवढे बदलले ज्वारी प्रतिमण 5 रुपये वरुन तर 6 रुपये वाजरी प्रति 3 मणाचा भाव 12 रुपये करुन 19 रुपये केला. ही धान्याची किंमतवाढ शेतक–यांना मिळवून देण्यात आणि यावावत जागृती करण्यात मराठी वर्तमानपत्रांची भूमिका महत्वपुर्ण होती हे केसरीतून स्पष्ट होते.



Scanned by CamScanner

मानव आणि मानवी मुल्यांचा संहार करणारे दुसरे जागतिक महायुध्द इ. स. 1945 ला संपले. या काळात व़ृत्तपत्रांचा वाचक अधिक जिज्ञासू आणि जाग़ृत झाला. व़ृत्तपत्रा व्यवसायास धंद्यांचे स्वरुप आले. आर्थिक द़ृष्टिकोन वाढत गेला. व्यवस्थापक संपादकापेक्षा श्रेष्ठ झाला. अशा प्रसंगीसुध्दा मराठी व़ृत्तपत्रांनी आपली व़ृत्ती सोडली नाही, निष्ठा बदलल्या नाहीत की विचारधारी सोडल्या नाहीत उलट केसरी, मराठवाडा, ज्ञानप्रकाश सारख्या वर्तमानपत्रांनी हैद्राबात संस्थान संबंधी आपला रोख आक्रमकतेचा ठेवला.

*संदर्भ –*


1. गर्गे स.मा.(संपादक), पत्रकार आणि पत्रकरिता, मानसन्मान प्रकाशन, पुणे –04, ऑगस्ट 1999, पृ. 53.
2. केसरी, दि. 02 एप्रिल 1946, पृ. 02.
3. कित्ता, पृ. 02.
4. कित्ता, पृ. 02.
5. कित्ता, पृ. 02.
6. कित्ता, पृ. 03.
7. कित्ता, पृ. 02.
8. कित्ता, पृ. 02.
9. लेले रा.के., मराठी वृत्तपत्रांच्या इतिहास, कॉन्टिनेंटल प्रकाशन, द्वि.आ., 2004, पुणे 30, पृ. 897–898
10. मराठींच्या अभिमान्यांना जिव्हाळयाचा इशारा– अग्रलेख : 'निजाम प्रांतीय साहित्य संम्मेलनात संस्थानातील मराठीच्या संसाराची विवंचना विशेष चिकित्सेने केली जाणे साहजिक आहे. महाराष्ट्र साहित्य संम्मेलनासारखी व्यापक संस्था असताना वेगळे प्रादेशिक संम्मेलने भरणे कितपत हितावह आहे असा एक विवाद्य प्रश्नही या नमित्याने उभा राहतो ........ मोठ्या साहित्य संम्मेलनात वाव न मिळणाऱ्या व तुटपुंज्या साहित्य सेवेवर स्वतःची जाहिरात करणाऱ्या चिल्लर सहित्यीकांना आपल्या चिल्लर कार्याचे कौतूक अशा संमेलनातून करुन घेता येते. अशा संमेलनातुन जे स्थानिक जिव्हाळ्याचे व नाजुक प्रश्न धसाला लागतील ते अखिल महाराष्ट्राच्या संम्मेलनातून निकालात लावणे अवघड होईल शिवाय यंथील राज्यकर्त्यांचे धोरण परस्परांना आपवल्या टापूत कसलीही चळवळ करण्यास वाव न देण्याचे असल्यामुळे 'ज्यांचे पोट दुःखते त्यांना ओवा खावा' या न्यायाप्रमाणे आपआपल्या प्रश्नाबद्दल आपआपसात मार्ग काढणे हितावह ठरते. संम्मेलनाची प्रथा याच दृष्टीने आम्हांस (सकाळ) उपयुक्त वाटते'. –(सकाळ, दि. 29 सप्टेंबर 1943, पृ.2.)
11. सकाळ, दि. 29 सप्टेंबर 1943, पृ. 02.
12. कित्ता, दि. 29 सप्टेंबर 1943, पृ. 02.
13. कागत आणि किंमत यांचा मेळ घालणारी योजना : वृत्तपत्रांच्या आकाराप्रमाणे (अ) 336 चौरस इंचापेक्षा जास्त, (व) 200–336 चौरस इंच, (क) 200 चौरस इंचापेक्षा कमी असे तीन वर्गात वर्तमानपत्रांचे विभाजन करण्यात यवुन पाव आणा किंमतीच्या वृत्तपत्रांना अनुकमे 2,2,4 अशी पाने एका अंकासाठी छापता येत. अर्ध्या आण्याच्या वृत्तपत्रांना अनुकमे 4,6,8ः पाउण आण्याच्या वर्तमानपत्रांना 6,8,12 तर 1 ते 1,25 आण्याच्या वर्तमानपत्रांना 8, 12, 16, तर 1.50 ते 1.33 आण्याच्या किंमतीच्या वर्तमानपत्रांना 13, 16, 18 ती 2 रु. किंमतीच्या वर्तमानपत्रांना 16, 24, 32 अशी पाने असणारा अंक काढता येत असे. प्रत्येक अंकाची पाने कमी जास्त करता येत पण आठवड्याची पृष्ठ संख्या ठरवून दिलेली होती.–(केसरी, दि. 19 डिसेंबर 1949, पृ. 14.)
14. केसरी, दि. डिसेंबर 1949, पृ. 02.
15. कागदवाटप पध्दती : इ.स. 1942 ला वर्तमानपत्राच्या कागदाची टंचाई होती म्हणून हिंदुस्थान शासनाने अमेरिकेतून कागद आयात करण्याची परवानगी घेतली. इ.स. 1942 मध्ये 16000 टल कागद आयात करण्यात आला पण कागदाच्या टंचाईमुळे इ.स. 1943 मध्ये




Scanned by CamScanner

25: कागद (4000 टन) आयात करण्याचा शासनाने निर्णय घेतला. त्यामुळे 200 टन कागद लागणाऱ्या वर्तमानपत्रांना 50 टन कागदांत वर्तमानपत्र चालविणे अवघड होते, या मागे शासनाचा हेतू वर्तमानपत्र बंद पडावीत हा होता असे स्पष्ट केले. –(केसरी, दि. 22 जानेवारी 1943, पृ. 04.)

16. कित्ता, दि. 13 फेब्रुवारी 1940, पृ. 03.
17. पंचधारा, जुलै – डिसेंबर 1991, व र्ष 34 अंक, 2–3, पृ.49.
18. कित्ता, पृ. 49.
19. निजामाला अपेक्षीत असणाऱ्या मागण्या :
    1. इतर संस्थानपेक्षा हैद्राबादला वेगळा दर्जा असावा.
    2. मच्छलीपट्टनम बंदर व वऱ्हाडचे जिल्हे मिळावेत.
    3. सिंकद्राबादहुन ब्रिटिश फौज हटविण्यात यावी.
    4. हैद्राबादने किती सैन्य बाळगावयाचे हे हैद्राबादला ठरविला यावे.
    5. हैद्राबाद स्वतःहत्यारे बनवेल.–(पंचधारा, जुलै – डिसेंबर 1991, व र्ष–34, अंक 2–3, पृ.49.)
20. ज्ञानप्रकाश, दि. 30 जानेवारी 1940, पृ. 04.
21. पुढारी, दि दृ 16 सप्टेंबर 1940, पृ. 02.
22. हैद्रबाद संस्थानातील जुलुमःवैजापूर येथील 15 व्यापारी, भांडवलदार यांना तहसीलदाने 88,000 रुपये वार फंड दिल्याशिवाय जप्त केलेला माल परत करण्यास नकार दिला. –(केसरी, दि .23 ऑगस्ट 1940, पृ.06.)
23. केसरी दि. 23 ऑगस्ट 1940, पृ. 06.
24. कित्ता, दि. 25 सप्टेंबर 1940, पृ. 03.
25. कित्ता, दि. 23 जुलै 1942, पृ. 02.
26. पुढारी , दि. 27 ऑक्टोंबर 1940, पृ. 02.
27. शिलकी अंदापत्रक : 'जमा 9 कोटी 26 51 हजार तर खर्च 9 कोटी 23 लक्ष 19 हजार तर शिल्लक 3 लक्ष 32 हजार रुपये आहेत.' – (दै. पुढरी, दि. 27 ऑक्टोंबर 1940, पृ. 02.)
28. पुरोगामी योजनासाठी 1940–41 च्या बजेटमध्ये नमूद रक्कम : विहिरी खोदण्यासाठी (अव र्षण प्रदेशात) 8 लक्ष, शिक्षणासाठी 5 व र्षासाठी 12.5 लाख रु. शिरगणती तर 21 लाख रु. पाणी पुरवठा, 3.40 लाख रु. ड्रेनेज, 74. 14 इमारतीसाठी, 3,50 लाख रु एरोड्रम, 1.56 लाख रु. शिरगणती तर 21 लाख रु. युध्दासाठी मासिक देणगी,इ. – (दै.पुढारी, दि त्र 17 ऑक्टोंबर 1940, पृ. 02.)
29. कित्ता, दि. 27 ऑक्टोंबर 1940, पृ.02.
30. कित्ता, दि. 27 ऑक्टोंबर 1940, पृ.02.
31. मराठी ज्ञानेदय, दि. 05 डिसेंबर 1940, पृ.01.
32. कित्ता, पृ. 01.
33. केसरी, दि. 12 डिसेंबर 1940, पृ. 11
34. पंचधारा, पूर्वोकत, पृ. 49
35. ज्ञानप्रकाश, दि. 22 डिसेंबर 1942, पृ. 03.
36. दोन मासलेवाईक उदाहरा : शासनाच्या भाव नियंत्रण आणि वस्तु विकी नियम धोरणामुळे वस्तूंच्या टंचाई मुळे, युध्दकालीन परिस्थितीमुळे साध्या गरजेच्या वस्तुंची पुर्तता होवू शकत नव्हती. औरंगावादेत ताराचंद मुगदिया व श्री. तिवारी यांना वस्तु विकीबद्दल 25 रुपये दंड व 15 दिवसाची शिक्षा क्षुल्लक काडीपेटी विकल्याबद्दल करण्यात आली. –(दै. ज्ञानप्रकाश, दि. 27 जानेवारी 1943, पृ.02.)
37. सोलापूर समाचार, दि. 12 डिसेंबर 1942, पृ. 02.
38. ज्ञानप्रकाश, दि. 15 जुलै 1943, पृ. 02.
39. पिकलागवडीचे प्रमाण : इ.स.1942 इ.स.1943

| | | | |
|---|---|---|---|
| पिकलावड क्षेत्र | साळ (भात) = | 7 लाख एक्कर | 11 लाख एक्कर |
| | ज्वारी = | 76 लाख एक्कर | 96 लाख एक्कर |
| | कापूस = | 32 लाख एक्कर | 30 लाख एक्कर |

— (ज्ञानप्रकाश, दि. 15 जुलै 1943, पृ. 03.)

40. कित्ता, दि. 13 जानेवारी 1744, पृ. 02.
41. ज्ञानप्रकाश, दि. 15 जुलै 1943, पृ. 02.
42. पुढरी , दि. 27 फेब्रुवारी 1944, पृ. 02.
43. हैद्रबाद संस्थानात वृत्तपत्रांची : '....... संस्थानातील वृत्तपत्रांनी गळचेपी अन्य प्रश्नांसंधी सरकारी बातम्या येथील उर्दु — मराठी व तेलगु पत्रांनी अन्य प्रश्नासंबंधी सरकारी बातम्या अगर अत्रकें हि छापावयाची नाहीत असे ठरवले ते योग्यच आहे. मात्र निजाम सरकारने सरसकट सर्वच पत्रांची मुस्कटदाबी करणारा हा हुकुम काढला हेच आम्हाला समजत नाही. सरकारच्या अन्न धोरणांविषयी खोट्या बातम्या छापून जी वृत्तपत्रे निष्कारण गैर समज पसरवीत असतील त्यांच्यावर निजाम सरकाला सहज खटले भरवता येतील हा सरळ मार्ग न स्वीकारता. सर्वांनाच बंदी का करण्यांत यावी? वृत्तपत्रांतील बातम्या खोट्या आहेत असे सिध्द करता येणार नाही म्हणून तर सरकार भीत नाही ना? वस्तुतः अन्नप्रश्न हा सर्व जनतेचा प्रश्न आहे व त्यांबाबतीत सरकारने जे धोरण स्वीकारले असेल ते जनलतेला समजावूनल देवून तिचे सहकार्य मिळविण्याकरीता व सरकारच्या धोरणची अंमलबजावणी करताना जतनेला काही अन्याय होत असतील तर ते चव्हाट्यावर

मांडुन सरकारच्या नजरेस आणण्याकरिता वृत्तपत्रांची अत्यंत आवश्यकता आहे. ....... उलट बंदी हुकूमामुळे जनतेच्या मनांत अनेक शंका—कु—शंका निर्माण होण्याचाच संभव आहे. कारण सरकारचे धोरण सोज्वळ व जनहिताचे असे तर वृत्तपत्रांना बंदी करण्याची आवश्यकता भासली नसती. —(दै.पुढारी, दि. 27 फेब्रुवारी 1944, पृ. 02.)

44. केसरी, दि. 19 मे 1944, पृ. 08.
45. कित्ता, दि. 19 मे 1944, पृ. 08.
46. कित्ता, दि. 10 मे 1944, पृ. 08.
47. केसरी, दि. 19 मे 1944, पृ. 08.

Scanned by CamScanner